# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.विधी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : १५
## सभावृत्तांत

दिनांक : ५/२/२०१० वेळ : दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षीक सभा शुक्रवार दि.५/२/२०१० रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.एकनाथ मोटे
३. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब
४. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
६. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.देशमुख - सहा.आयुक्त,मा.काळे - नगरसचिव, मा.पाटील-उपसंचालक नगररचना, मा.जाधव,मा.कुदळे-कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-

विषय क्रमांक :- ११) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करणे. (महापालिका विकास योजनेतील प्रस्तावाने बाधित क्षेत्राचा मोबदला अदा न करता केलेल्या विकासकामाचे क्षेत्राचा मोबदला अदा करणेबाबत)

विषय क्रमांक :- १२) विकास योजना-पिंपरी चिंचचवड
पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजूर सुधारित विकास नियंत्रण नियमावलीतील टि.डी.आर.च्या नियम क्र.N २ .४.५ तरतूदीमध्ये म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत.

विषय क्रमांक :- १३) वॉर्ड क्र.७६ रहाटणी मधील अंतर्गत रस्त्यांचे ट्रेचेस खडीकरण व बी.बी.एम. पध्दतीने बुझविणेबाबत.

विषय क्रमांक :- १४) स्ट्रक्चरल डिझायनर पदासाठी नेमणुक करणेबाबत- मा.सिध्देश्वर बारणे मा.अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक :- १५) रहाटणी स.नं. २० येथील पाणीपुरवठा टाक्यांच्या आवारात स्थापत्य विषयक व ईतर अनुशंगिक कामे करणे. या कामा अंतर्गत थेरगांव स.नं. ९ येथील नविन पाण्याच्या टाकी जवळ पंप हाउस बांधणेबाबत- मा.सिध्देश्वर बारणे मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव.

-------

ठराव क्रमांक :- २४९ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ५/२/२०१० विभाग : उद्यान
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/स्था/२८/२०१० दि.१२.१.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शाहुनगर येथील राजर्षी शाहू उद्यानातील जेष्ठ नागरीकांचे शेडवर स्लॅब टाकणेकामी र.रु. ३६,२३,१००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक :- २५० विषय क्रमांक :- २
दिनांक :- ५/२/२०१० विभाग : विदयुत
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अप्र/वि/आ/९/२०१० दि.१२.१.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

निगडी गावठाण उपविभागातील विविध झोपडपट्टयांमध्ये प्रकाश व्यवस्थेअंतर्गत एनर्जी सेव्हींग करिता फिटींग बदलणेकामी र.रु.३५,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- २५१ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ५/२/२०१० विभाग : प्रशासन
सुचक :- मा.सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/१/कावि/६१/२००९ दि.११.०१.२०१०

विषय :- श्री.ए.वाय.कारचे,मुख्याधिकारी गट-अ यांची सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील नियुक्तीबाबत.

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- २५२ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ५/२/२०१० विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा.एकनाथ मोटे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कमु/३/१० दि.१९.०१.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.१९ गव्हाणेवस्ती येथील ओ.पी.डी.चे विस्तारीकरण

करणे (नि.क्र.१३/२४ - २००८ /०९ )कामामध्ये भोसरी हॉस्पिटलची दुरुस्ती, रंगरंगोटी व काही नवीन कामे करणेस तसेच वॉर्ड क्र.१९ मधील स्थापत्य विषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

(निविदा र.रु.२१,८६,५३८/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- २५३ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- ५/२/२०१० विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/डमु/१९/२०१०

दि.१९.०१.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

थेरगाव वॉर्ड क्र. ८४ मध्ये रस्त्याच्या कडेने तसेच अंतर्गत भागात इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेकामी र.रु.३०,६६,१००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- २५४ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- ५/२/२०१० विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/वाशा/२२/२०१०

दि.२५.०१.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड शहरातील ड प्रभाग व मुख्यालय येथील मुख्य चौक

व रस्ते यासाठी वाहतुक सुविधाविषयक विविध कामे करणेकामी र.रु.२०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- २५५ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- ५/२/२०१० विभाग : भुगयो
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/३७३/१०
दि.२७/०१/२०१०

विषय :- चिंचवड मैलाशुध्दीकरण केंद्र त्रैवार्षिक कालावधीकरिता चालन देखभाल दुरुस्तीकामी देणेबाबत.

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- २५६ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- ५/२/२०१० विभाग : भुगयो
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.एकनाथ मोटे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/३७४/१०
दि.२७/०१/२०१०

विषय :- कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्र टप्पा-१ त्रैवार्षिक कालावधीकरीता चालन देखभाल दुरुस्तीकामी देणेबाबत.

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- २५७ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- ५/२/२०१० विभाग : भुगयो
सुचक :- मा.सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/३७५/२०१०
दि.२७/०१/२०१०

विषय :- भुगयो अंतर्गत वाल्हेकरवाडी पंप हाऊस येथील पंपींग मशीनरीची चालन देखभाल दुरुस्ती करणेबाबत.

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- २५८ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- ५/२/२०१० विभाग : प्रशासन
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/१३८/२०१० दि.२७/०१/२०१०

विषय :- "प्रशासन अधिकारी" पदावर पदोन्नतीने नेमणुकीस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक :- २५९ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- ५/२/२०१० विभाग : नगररचना
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/७/२०१० दि.४/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

टि.डी.आर. बाबतचे दि. ३ फेब्रुवारी २००७ रोजीचे शासननिदेश व त्यानुषंगाने नगर विकास विभागाकडील दि. १६/८/२००७ रोजीचे मार्गदर्शन याचा साकल्याने विचार करता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेबरोबर केलेल्या लेखी करार असल्यास कराराचे तारखेपासून किंवा महापालिकेची सुधारित मंजूर विकास योजना आराखडयाच्या मंजूरी दिनांकापासून म्हणजेच दि.१८ सप्टेंबर १९९५ पासून जमिन मालकांना कोणताही मोबदला न देता प्रत्यक्षात त्यांच्या ताब्यात असलेल्या जागेवर रस्ते व आरक्षणे इ. विकास कामे केलेली आहेत अशा सर्व संबंधितांना महानगरपालिकेच्या नावे नोंदणीकृत हस्तांतर दस्त

लिहून दिल्यास नियमाप्रमाणे होणारा मोबदला एफ.एस.आय./टि.डी.आर.च्या स्वरुपात देणेकामी व त्याप्रमाणे प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र अ व प्रपत्र ब प्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- २६० विषय क्रमांक :- १२
दिनांक :- ५/२/२०१० विभाग : नगररचना
सुचक :- मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/वि.नि.नि./०८/२०१० दि.०४/०२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आरक्षित जागेच्या सभोवताली असलेल्या वापराचे वर्गीकरण विचारात घेऊन विकास हक्क हस्तांतरणासाठी (टि.डी.आर.)अनुज्ञेय करावयाचा चटई क्षेत्र निर्देशांक किती असावा हे प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमूद करण्यात आलेले असुन त्यानुसार म.प्रा.व न.रा.अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नियम क्र. N.2.4.5 मध्ये बदल करणेसाठी/तरतुदी नव्याने समाविष्ट करणेसाठी पुढील प्रमाणे फेरबदल प्रस्तावीत करण्यात आला असुन-

“ N.2.4.5- The builtup area for the purpose of F.S.I. credit in the DRC shall be equal to the gross of the reserved plot to be surrendered & will proportionately increase or decrease according to the permissible FSI of the Zone where from the TDR has originated and more particularly mentioned in Table No.31”, त्यानुसार सदरचे नियम विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करण्याच्या फेरबदलास म.प्रा. व न.रा. अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- २६१ विषय क्रमांक :- १३
दिनांक :- ५/२/२०१० विभाग : ड प्रभाग
सुचक :- मा.सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.एकनाथ मोटे

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.डप्र/स्था/१/कावि/९२९/२००९ दि.२९/१२/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

वॉर्ड क्र.७६ रहाटणी मधील अंतर्गत रस्त्यांचे ट्रेचेस खडीकरण व बी.बी.एम. पध्दतीने बुझविणेकामी र.रु.१२,७५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- २६२ विषय क्रमांक :-१४
दिनांक :- ५/२/२०१०
सुचक :- मा.सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.सिध्देश्वर बारणे मा.अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव.

"नागरीकांना पायाभुत सुविधा देणेसाठी विविध विकास कामे सुरु आहेत. विकास कामांमध्ये मोठे रस्ते,पुल,इमारती इ.चा समावेश आहे. सदर कामांचे संकल्पचित्र (Structural Design) म.न.पा.स इतर मान्यता प्राप्त स्ट्रक्चरल डिझायनर यांचे मार्फत करुन घ्यावे लागते. सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई प्रादेशिक विकास महामंडळ इ. ठिकाणी प्रकल्पाच्या संकल्पचित्राची पुर्नतपासणी केली जाते. जेणेकरुन डिझाईनमध्ये चुका अथवा त्रुटी राहणार नाही. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग,महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,मुंबई प्रादेशिक विकास महामंडळ इ. ठिकाणी प्रकल्पाच्या संकल्पचित्राची तपासणी करणेसाठी प्रुफ कन्सल्टंट याची नेमणूक केली जाते. त्यासाठी मनपातीलच पात्र उमेदवारास सदरचे काम करणेसाठी संधी द्यावी असे वाटते. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमात सन २००८-२००९ मध्ये केलेल्या सुधारणाप्रमाणे म.न.पा.तर्फे होत असलेल्या सर्व विकास कामांचे स्ट्रक्चरल ऑडीट होणे अत्यावश्यक व बंधनकारक आहे. त्यानुसार म.न.पा. चे प्रकल्प आणि म.न.पा.कार्यक्षेत्रात असणा-या खाजगी मालमत्ता,सोसायटया यांचेही स्ट्रक्चरल ऑडिट करणे अत्यावश्यक आहे. इतर महापालिकांमध्ये याबाबत कार्यवाही सुरु आहे. त्यासाठी स्ट्रक्चरल डिझायनर या पदाची आवश्यक लक्षात धेता, स्ट्रक्चरल डिझायनर या पदासाठी मान्यता देऊन महापालिका आस्थापनेवरील मनपातील स्ट्रक्चरल डिझाईन या क्षेत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व्यक्तीची नेमणूक करावी. त्यासाठी (१) स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी (B.E.Civil) (२) महापालिकेमधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. (३) स्ट्रक्चरल इंजिनिअरींगमधील पदव्युत्तर अभ्यासक्रम म्हणजेच एम.टेक. सिव्हील-स्ट्रक्चरल इंजिनिअरींग अशी शैक्षणिक अर्हता असणे व त्यातील अनुभव असणे आवश्यक आहे. (४) Insititution Of Engineers- India यांचेकडील Chartered Engineer (सनदी अभियंता) प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे,याप्रमाणे म.न.पा.आस्थापनेवरील पात्र उमेदवार श्री.अजय सदाशिव नहिरे यांची स्ट्रक्चरल डिझायनर या पदासाठी र.रु. १५६००-३९१००, ग्रेड वेतन ५४०० या वेतनश्रेणीत नेमणूक करावी", असा प्रस्ताव ठेवणेत आला आहे त्यास मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- २६३ विषय क्रमांक :- १५
दिनांक :- ५/२/२०१०
सुचक :- मा.सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.सिध्देश्वर बारणे मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव-

थेरगांव स.नं. ९ येथील नविन पाण्याच्या टाकीचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर टाकी कार्यन्वित करणेचे दृष्टीने याठिकाणी पंपहाउस बांधणे आवश्यक आहे. पुरेशा बजेट तरतुदी अभावी व संबंधीत टाकीचे ठेकेदार यांच्या आर्थिक अडचणीमुळे त्यांचेकडुन पंपहाउसचे व सिमाभींत बांधणेचे काम होत नाही. त्यामुळे कामाची निकड लक्षात घेउन सदरचे काम निविदा क्र. ४/२०-२००७/०८ रहाटणी स.न.२० टाकीचे आवारात स्थापत्य विषयक व ईतर अनुषंगीक कामे करणे या कामामधुन करता येईल. तरी सदरचे काम तातडीचे असलेमुळे रहाटणी स.नं. २० येथील पाणीपुरवठा टाक्यांच्या आवारात स्थापत्य विषयक व ईतर अनुशंगिक कामे करणे या कामाअंतर्गत थेरगांव स.नं.९ येथील नविन पाण्याच्या टाकीजवळ पंपहाऊस बांधणे या प्रमाणे साईट बदलास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय

क्रमांक - नस/९/कावि/ २२२ /२०१०

दिनांक - ६/२/२०१० चे लगत सही/-

नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे

पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.